अडचणींची कसरत करत ‘डोंबाऱ्या’चा प्रवास पडद्यावर

"लहानपणापासून डोंबारी ही भटक्यां समाजाचा विषय डोक्यात घोळत होता. जेंव्हा जमले तेंव्हा एकडून-तिडून पैसे जमवले. कुटुंबाने मदत केली. अडचणी खूप आल्या पण अखेर 'जिप्सी' पडद्यावर आलाच!” पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)मध्ये आज 'जिप्सी' हा चित्रपट प्रदर्शीत झाला आणि त्यामागची कथाही उलगडत गेली.

“फिरतीवर असणं हेच ज्यांचे आयुष्य असा लहानपणी पाहिलेला डोंबारी; अस्वस्थ, भटका, अन्नाचे हाल हे मला दिसत होते. त्याला संधी मिळताच 'जिप्सी' म्हणून मी आज पडद्यावर आणले, “ अशी चित्रपटामागची कथा दिग्दर्शक शशी चंद्रकांत खंदारे यांनी उलगडून सांगितली. ‘जिप्सी’ हा चित्रपट या वर्षीच्या बाविसाव्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये मराठी चित्रपट स्पर्धा विभागामध्ये प्रदर्शित झाला. त्यावेळी ते बोलत होते.

"मी लहानपणी आमच्या गावात हे डोंबाऱ्याचं पात्र बघितले होते. ती गोष्ट कुठेतरी कायम डोक्यात होती. ती कथा मी २०१९ पासून विणत आणली होती. २०२० साली त्याला निर्माता मिळाला आणि ते करण्याचा निर्णय आम्ही घेतला. पण तेव्हा कोव्हिड आल्याने शेड्युल रद्द झाले. अशी दोन वर्षे गेली. ते काम रखडले गेले. त्यावेळी ठरवलेले कलाकार वयाने मोठे झाले होते. काही कलाकार मागे फिरले. निर्माता मागे फिरला, पैसे परत मागू लागला. मग वेगळ्या कामाकडे वळण्याचा निर्णय देखील झाला पण, एके दिवशी वाटले नाही! आपण ‘जिप्सी’च पूर्ण करू! इकडून तिकडून उसने पैसे गोळा केले, मित्रांकडून मागितले. मी, माझी पत्नी आणि माझ्या भावांनी साठवलेली पुंजी ‘जिप्सी’साठी देण्याचे ठरवले आणि ‘जिप्सी’ करण्याची जिद्द पूर्णत्वाला आली," असे खंदारे यांनी सांगितले.

शशी खंदारे सोलापूर जिल्हयातल्या एका छोट्या गावातून आले आहेत. त्यांना लहानपणापासूनच कलेची संगत आहे. "माझी आजी नक्कल करायची, मलाही नेहमीच वाटायचे कलाक्षेत्रात काहीतरी करावे. घरच्यांचा हट्ट म्हणून बी. कॉम.ची पदवी घेतली, मग मात्र कलेकडे वळलो. नाटकं केली ६- ७ वर्ष, कविता रचल्या आणि नंतर मला व्यक्त व्हायला सिनेमा हे माध्यम सापडले. सुरुवात क्लॅपर म्हणून केली, मग ज्युनिअर आर्टिस्ट म्हणून सिरियल, सिनेमे केले. आणि शिकत, जिद्दीने दिग्दर्शक झालो. माझ्या बाबतीत जे घडले, ते मी माझ्या भावंडांसोबत होऊ दिले नाही. माझे दोन्ही भाऊ कलाविषयक अभ्यासक्रमात शिकले." असं खंदारे यांनी सांगितलले.

‘जिप्सी’मध्ये डोंबारी समाजाचा उत्तम पवार नावाचा नायक त्याच्या कुटुंबासह उत्तर- कर्नाटकापासून कोकणापर्यंत प्रवास करत असतो. दरम्यान त्याच्या बायकोला स्थिर आयुष्याची ओढ असते. फिरतीच्या अस्थिर आयुष्यामध्ये त्यांच्या मुलाची अपेक्षा फक्त ताज्या अन्नाची असते. कुटुंबाची जगण्यासाठी लागणाऱ्या प्राथमिक सोयींसाठीची धडपड आपल्याला दिसते. ‘जिप्सी’ हा चित्रपट डोंबाऱ्यांचं खेळापलीकडचे जगणे समोर आणतो.